# <u>प्रेस नोट</u>

## परिमंडळ 02 अधिनस्थ पोलीस ठाण्यांमध्ये दाखल एकुण 08 सायबर फसवणुकीचे गुन्हे उघड केलेबाबत.....

परिमंडळ 02 अधिनस्थ पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झालेल्या सायबर फसवणुकींच्या गुन्हयांचा तपास करून आरोपींचा शोध घेणेकरता गांवदेवी पो. ठाणेच्या म.पो.नि. कोडापे, डॉ.दा.भ. मार्ग पो. ठाण्याचे सायबर गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउपनि आरडक आणि सायबर पथकातील अंमलदार यांचे विशेष पथक बनवून सदरचे पथक पश्चिम बंगाल येथे रवाना करण्यात आले होते.

सदर पथकाने पश्चिम बंगाल येथील कोलकाता शहर, हुगळी, हावडा, उत्तर 24 परगणा या जिल्हांमध्ये जावून 16 दिवस अहोरात्र अथक परिश्रम करून तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे डॉ. दा.भ. मार्ग पोलीस ठाण्याचे 04 गुन्हे, गांवदेवी पोलीस ठाण्याचे 03 गुन्हे आणि वि.प. मार्ग पोलीस ठाण्याचा 01 गुन्हा असे एकुण 08 गुन्हे उघड करून 13 आरोपी निष्पन्न करण्यात आले आणि तपासादरम्यान आरोपीतांकडून उपरोक्त गुन्हयांपैकी डॉ.दा.भ. मार्ग पोलीस ठाणेच्या 04 गुन्हयामध्ये मिळून 91,500/—रूपये रोख रक्कम तर गांवदेवी पोलीस ठाणेच्या 01 गुन्हयामध्ये 20,000/— रूपये रोख रक्कम अशी एकुण 1,11,500/— रूपये इतकी रोख रक्कम हस्तगत करण्याची उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. डॉ. श्री. अभिनव देशमुख, अप्पर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. डॉ. श्री. मोहीतकुमार गर्ग, पोलीस उपायुक्त, परिमंडळ 02 यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. सारिका कोडापे,स.पो.नि. डिगे, पो.उप.निरी. अविनाश आरडक, पंकज होले, पोलीस हवालदार आनंद गावडे, पोलीस शिपाई सूरज धायगुडे, चैत्राम पावरा, सिद्धनाथ गलांडे यांनी पार पाडली.